क्षयरोगाचे सहा महिने आधीच भाकीत शक्य

पीटीआय, लंडन

आरोग्य वार्ता

क्षयरोगाची बाधा होण्यापूर्वी तीन ते सहा महिने आधीच या रोगाचे भाकीत करू शकेल, अशी नवी रक्तचाचणी विकसित करण्यात संशोधकांना यश आले आहे. यामुळे क्षयरोगावर अधिक चांगले उपचार करून अनेकांचे जीव वाचविणे शक्य होणार असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.

हे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांत एका भारतीय वंशाच्या शास्त्रज्ञाचाही समावेश आहे. 'लॅन्सेट रेस्पिरेटरी मेडिसिन जर्नल'मध्ये याबाबत माहिती प्रसिद्ध झाली आहे. क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये या रोगाची लक्षणे दिसून येण्यापूर्वीच या रोगाचे भाकित करू शकेल यासाठी कोणता जनुकीय आविष्कार उपयुक्त ठरू शकेल, याचा शोध शास्त्रज्ञांनी घेतला.

या संदर्भात इंग्लंडमधील 'युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन'चे ऋषि गुप्ता म्हणाले की, जनुकीय आविष्कार निदर्शक चाचणीमुळे या संसर्गजन्य रोगाला वेळीच प्रतिबंध करून लवकरात लवकर उपचार करणे शक्य होणार आहे. क्षयरोगाच्या उद्भवाचे भाकीत करू शकतील अशी वेगवेगळी जनुकीय आविष्काराची चिन्हे आम्ही शोधली आहेत, असे त्यांनी सांगितले.

अनेक प्रकारच्या रोगांचे निदान, रोगाच्या संभाव्य अवस्थेचे भाकीत आदी करण्यासाठी जनुकीय आविष्कार चिन्हांचा वापर केला जात आहे, काही जनुकीय आविष्कार चिन्हांचा वापर हा कर्करोगावरील उपचारांसाठीही केला जात आहे, पण, क्षयासारख्या संसर्गजन्य रोगांवरील उपचारांत अद्याप असा जनुकीय आविष्कारांचा उपयोग कोणी केलेला नाही.

नुकत्याच झालेल्या या संशोधनात क्षयरोग झालेल्या व्यक्तींच्या रक्तचाचणीतून जनुकीय आविष्कार चिन्हांचा शोध घेण्यात आला. त्यानंतर निरोगी व्यक्तींच्या रक्तचाचण्या करून त्यांच्याशी आधीच्या चाचण्यांची तुलना करण्यात आली.

क्षयरोगाच्या नव्या चाचणीची अचूकता ही जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करणारी असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे.



कफावर जालीम उपाय, आयुर्वेदिक ENT स्पेशालिस्ट
शारंगधर
शारंगधर कॉफको व ट्रायसेप्टा
वारंवार शिंगणी सर्दी आणि ओला व कोरडा खोकला, नाक चोंदणे, आवाज बसणे, घसा लाल होणे, घसा खवखवणे, पडताना सूज येणे असे विकार शारंगधर कॉफको वरोबर शारंगधर ट्रायसेप्टा घेताच दूर होतात.
To know more & buy online Scan QR Code With your mobile phone
आयुर्वेदिक टॅब्लेट्स
• सर्व प्रमुख औषधी दुकानात उपलब्ध • Buy Online : www.sharangdhar.com • मोफत वैद्यकिय सल्ला - 95 95 100 500

ग्रीनपीस इंडिया संस्थेचा अहवाल

राज्यात मुंबई सर्वाधिक प्रदूषित

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर, मुंबई : भारतातील २८७ शहरांपैकी २३१ शहरे हवा गुणवत्तेच्या बाबतीत धोक्याच्या पातळीत आली असून महाराष्ट्रातील २० शहरांचा यात समावेश आहे. मुंबई हे राज्यातील सर्वात प्रदूषित शहर म्हणून गणले गेले आहे. मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक हा राष्ट्रीय गुणवत्ता निर्देशांकापेक्षा तीनपटीने खालावला आहे. मुंबईच्या हवेच्या प्रदूषणात मुख्यत: पीएम १० घटकांचे वाढते प्रमाण कारणीभूत आहे, ग्रीनपीस इंडिया या पर्यावरण संस्थेच्या चमूने दरवर्षी एक पर्यावरणीय अहवाल सादर केला जातो. या वर्षीच्या अहवालात ही माहिती समोर आली आहे.

हवेतील अतिसूक्ष्म कणांबाबत (पीएम १०) मुंबई शहर सर्वाधिक प्रदूषित ठरले आहे, या शहरातील हवेची गुणवत्ता जागतिक आरोग्य संघटनेच्या हवा प्रदूषणाबाबत असलेल्या मानकापेक्षा आठपट अधिक आहे. मुंबईच्या हवेच्या प्रदूषणात मुख्यत: पीएम १० घटकांचे वाढते प्रमाण कारणीभूत असल्याचे ग्रीनपीसच्या अधिकाऱ्याने सांगितले. मुंबईतील वाढती वाहतूक, वाढती लोकसंख्या, उद्योगधंदे आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या बांधकामामुळे प्रदूषणाचा पातळीत वाढ होत असल्याचे दिसून येते. सुमारे वर्षभरापूर्वी राज्यातील हवेच्या प्रदूषणाच्या अहवालातदेखील मुंबईतील हवेत पीएम घटक आणि नायट्रोजन ऑक्साईडच्या उत्सर्जनात वाढ झाल्याचे स्पष्टपणे अधोरेखित झाले होते.

जानेवारी २०१९ मध्ये भारतासाठी पहिला राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. याअंतर्गत २०१७ पासून २०२४ पर्यंत शहरातील वायू प्रदूषणाचे प्रमाण २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या प्रत्येक शहरासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. ग्रीनपीसच्या अहवालात असेही म्हटले आहे की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केवळ १२२ सर्वाधिक प्रदूषित शहरे ओळखली आहेत. ही १२२ शहरे २८ राज्ये आणि नऊ केंद्रशासित प्रदेशांतील आहेत. त्यातील १६६ शहरांनी राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांची मर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे या शहरांचाही समावेश सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत करावा.

२० शहरे अतिप्रदूषित

- हवेतील अतिसूक्ष्म कणांबाबत (पीएम१०) मुंबई सहर सर्वाधिक प्रदूषित ठरले आहे.
- डोंबिवली, बंदूपूर, उल्हासनगर, ठाणे, पुणे, अमरावती, नागपूर, जालना, लातूर, कोल्हापूर, पिंपरी, चिंचवड, नाशिक, नांदगाव, औरंगाबाद आणि मिरवेढा वेरावेल हवेची गुणवत्ता राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकापेक्षा व जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडापेक्षा आठपट अधिक आहे.



• वॉशिंग्टनच्या अमरासनकुमार, डोंबिवली, ठाणे, पिंपरी, चिंचवड, नवी मुंबई आणि मिरवेढा ही शहरे नव्याने मानकापेक्षा अधिक हवा प्रदूषित शहरांच्या यादीत आली आहेत.

कुर्ल्यात महिलेवर सामूहिक बलात्कार, चौघांना अटक

लोकसत्ता, प्रतिनिधी

कुर्ला रेल्वे स्थानकावरून टॅक्सीसाठी दिशेने जाणाऱ्या एका ३३ वर्षीय महिलेवर चौघांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी रात्री कुर्ला येथे घडली.

या प्रकरणी नेहरूनगर पोलिसांनी सोनू तिवारी, नीलेश सारस्कर, सिद्धार्थ बाघ आणि श्रीकांत भोगले या चारही आरोपींना अटक केली. पीडित महिला मंगळवारी रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान कुर्ला रेल्वे स्थानकावरून टॅक्सीसाठी दिशेने जात होती. याचवेळी तेथे नशा करत असलेल्या नराधमांनी तिला एकटी पाहून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिच्याकडील रोख रकमेस ३ हजार रुपये आणि सोन्याचे मंगळसूत्र असा ऐवज घेऊन पोबारा केला. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर काही रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांना कळवले. पोलिसांनी चौघांना अटक केली असून चारही आरोपी कुर्ला परिसरातील राहतात.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्सचेंज प्लाझा, सुरेश रोड, पावशा, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५३.
सीआयएन: U74999MH2008PLC185349;
ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com
संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

सूचना

सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) (स्टॉक एक्स्चेंजेस अँड क्लिअरींग कॉर्पोरेशन्स) रेग्युलेशन्स, २०१८, च्या नियम ३३ आणि सेबी (डिस्टरींग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, च्या नियम ४७ च्या अनुरोधाने सूचित करण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी मुंबई येथे, इतर विषयांबरोबर, कंपनीच्या ३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहिन्यांकरीता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मंजूर करणे यासाठी घेण्यात येणार आहे.

उक्तेहित सूचना, कंपनीचे संकेतस्थळ https://www.mcxccl.com/disclosures/announcement वर उपलब्ध आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेडकरीता
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: जानेवारी २१, २०२०

'टीईटी' उत्तीर्ण न झालेल्या हजारो शिक्षकांना दिलासा

सेवेतून कमी करणे, वेतन थांबवण्याच्या आदेशाला स्थगिती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : प्राथमिकच्या १३ फेब्रुवारी २०१३नंतर रुजू झालेल्या मात्र ३० मार्च २०१९ पर्यंत शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) उत्तीर्ण न झालेल्या राज्यभरातील खासगी-सरकारी शाळांतील सहाय्यक शिक्षकांना कामावरून कमी करण्याचा तसेच त्यांचे वेतन थांबवण्याचा शिक्षण विभागाच्या आदेशाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे राज्यभरातील आठ हजार शिक्षकांना तूर्त दिलासा मिळाला आहे.

या आदेशामुळे बाधित झालेल्या राज्यभरातील विविध खासगी आणि सरकारी ३५ शाळांतील शेभरच्या आसपास शिक्षकांनी ॲड. सुरेश पाकळेमार्फत शिक्षण विभागाच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या आदेशाचा फटका आठ हजार शिक्षकांना बसणार असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे कामावरून कमी करण्याच्या आदेशाला स्थगिती देण्याची तसेच वेतन सुरू करण्याचे आदेश देण्याची विनंती शिक्षकांनी केली होती. न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्या. रियाज छागला यांच्या खंडपीठाने ही मागणी मान्य करत त्यांना दिलासा दिला.

याचिकेनुसार, शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत ३१ मार्च २०१० रोजी केंद्र सरकारने एक अध्यादेश काढला. त्यानुसार प्राथमिकच्या सहाय्यक शिक्षकांना किमान पात्रता बारावी, डीएड आणि 'टीईटी' बंधनकारक करण्यात आली. याच धर्तीवर राज्य सरकारनेही १३ फेब्रुवारी २०१३ रोजी अध्यादेश काढून हाच नियम कार्यरत असलेल्या प्राथमिकच्या सहाय्यक शिक्षकांना लागू केला. ही पात्रता पूर्ण करण्यासाठी विशेष करून 'टीईटी'साठी कालमर्यादा घालून देण्यात आली. परंतु काही महिन्यांनी म्हणजे ऑगस्ट २०१३ रोजी नवा अध्यादेश काढून त्यातून 'कार्यरत' हा शब्द वगळला. त्यानंतर 'टीईटी'चे स्वरूप काय असेल याबाबत नव्याने अध्यादेश काढण्यात आला, त्यातही नव्या अध्यादेशाने बदल करण्यात आला. त्यानुसार पहिली ते पाचवी व ६ वी ते ८ वी इयत्तेला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी स्वतंत्र 'टीईटी' बंधनकारक करण्यात आले. या कालावधीत बऱ्याच शिक्षकांनी 'टीईटी' दिली. त्यात काही उत्तीर्ण झाले, तर काही अनुत्तीर्ण झाले. २६ ऑगस्ट २०१८ मध्ये शिक्षण विभागाने आणखी एक अध्यादेश काढला. त्यात १३ फेब्रुवारी २०१३नंतर रुजू झालेल्या शिक्षकांनी ३० मार्च २०१९ पर्यंत 'टीईटी' उत्तीर्ण करण्याची अट घालण्यात आली.

२४ डिसेंबर२०१९ ला पुन्हा अध्यादेश काढून सगळ्या खासगी व सरकारी शाळांनी ३० मार्च २०१९ पर्यंत 'टीईटी' न करणाऱ्या सहाय्यक शिक्षकांना काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले. तसे करण्यात आले नाही, तर त्यांचे वेतन दिले जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले. ३१ डिसेंबरला नवा अध्यादेश काढून या शिक्षकांचे वेतन बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.

FORCE MOTORS LIMITED
CIN:L34102PN1958PLC011072
Regd. Office : Mumbai-Pune Road, Akurdi, Pune - 411 035, INDIA.
FORCE

NOTICE OF BOARD MEETING

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and other applicable provisions, NOTICE IS HEREBY GIVEN THAT a meeting of the Board of Directors will be held on Thursday, 30th January, 2020, at the Registered Office of the Company at Mumbai-Pune Road, Akurdi, Pune - 411 035, to consider and approve, inter alia, the Unaudited Financial Results for the quarter and nine months ended on 31st December, 2019.
This intimation is also available on the website of the Company and the website of BSE Limited at www.forcemotors.com and www.bseindia.com respectively.
For Force Motors Limited
Sd/-
Kishore P. Shah
Company Secretary & Compliance Officer
Place : Pune
Date : 21st January, 2020

IL&FS
PUBLIC ANNOUNCEMENT FOR CREDITORS OF SPECIFIED IL&FS GROUP ENTITIES

IL&FS, as per orders passed by Hon'ble NCLAT and NCLT, had issued public advertisements on May 22, 2019 inviting claims from creditors of seventy IL&FS Group entities (the "Phase I Entities") in respect of liabilities due up to and including October 15, 2018 to be submitted to Grant Thornton India LLP, Claims Management Advisor appointed in respect of the concerned IL&FS Group entities.
The public advertisements and other details, including the company names and claim filing details of the Phase 1 Entities, are available on the IL&FS website: https://www.ilfsindia.com/claim-management.
To enable those creditors of Phase 1 Entities who had not filed their claim within the earlier deadlines, the last date of submission of claims along with proof is extended to February 5, 2020. No further extensions will be granted.
Creditors are advised to follow all instructions carefully and submit their claims along with proof to the Claims Management Advisor within the extended deadline. For any queries/ clarifications or further information, you may write to ilfs.claims@in.gt.com
Date : January 22, 2020
Place: Mumbai

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित
(भारत सरकारचा उपक्रम)
नौकानयन भवन, हिरेन सरदार, २४५ पंडित मदन मोहन मार्ग, शिवडी, मुंबई - ४०० ०१५. वेबसाइट: www.shipindia.com Twitter: @shippingcorp • सीआयएन: L63030MH1950GOI008033
सूचना
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम २९ आणि ५० अन्वये अशी सूचना देण्यात येते की, दिनांक ०४.०२.२०२० रोजी कंपनीच्या मुंबई येथील नौकानयन कार्यालयामध्ये संचालक मंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यात अन्य बाबींबरोबर दिनांक ३१.१२.२०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचे अलेखापरीक्षित आर्थिक व एकत्रित आर्थिक परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ३३ अन्वये संमत करण्यात येतील.
सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.shipindia.com तसेच स्टॉक एक्स्चेंजेसच्या संकेतस्थळांवर म्हणजे www.bseindia.com व www.nseindia.com येथे पाहता येईल.
संचालक मंडळाच्या आदेशानुसार
भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित
ठिकाण : मुंबई
दिनांक : २२/०१/२०२०
दिनेश्वर झलदार
कार्यकारी संचालक (विधी कार्य) आणि कंपनी सचिव
मालाचे परिवहन, जीवनात परिवर्तन.

ई-निविदा सूचना
साहाय्यक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म. रा.
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रा (पूर्व), मुंबई-५१
दू. क्र. २६५१०९९२. ई-मेल-addclmum@yahoo.co.in
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा मुंबईसाठी लागणारे केमिकल्स / रसायने, रसायनवेअर, फिल्टर पेपर, गीडिया व BET चाचणीकरिता लागणारे Lal-Kit इ. खरेदी करणेसाठी वार्षिक दर करार करणेबाबत. दोन लिफाफा पद्धतीनुसार (तांत्रिक व व्यापारी दरासंबंधीच्या) उत्पादक, सोल सेलिंग एजंट, अधिकृत डीलर, सप्लायर यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने दिनांक १६.०१.२०२० ते ०४.०२.२०२० या कालावधीत ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात आल्या आहेत.
सदर कालावधीत बिडिंग डॉक्युमेंट पाहू शकता व डाऊनलोड करू शकता.
ई-निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाइटवर दिनांक १६.०१.२०२० ते ०४.०२.२०२० दुपारी १२.०० पर्यंत (Bid Submission) करू शकता.
दिनांक : १७.०१.२०२०
ठिकाण : मुंबई
सही/-
साहाय्यक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा,
मुंबई-५१
ही.सी.आय.पी.जा. २०१९/२२७/एम्एम्

विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर धनंजय मुंडेंची वसतिगृहाला भेट

बीडीडी वसतिगृहाचा कायापालट करणार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



मुंबई : वरळी बीडीडी चाळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घेत सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी या वसतिगृहाला भेट देऊन तेथील दुरवस्थेची पाहणी केली. मात्र त्याच वेळी त्यांनी आपण स्वत: या वसतिगृहाची जबाबदारी घेतली आहे, येत्या काही दिवसांत आपण त्याचा कायापालट करू, अशी ग्वाही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

या वसतिगृहातील मुला-मुलींना गेल्या अनेक वर्षांपासून गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. इमारतीची पडझड झाल्याने आहे. खोल्यांचा रंग उडालेला आहे. खाट, गाद्यांही खड नाहीत. स्वयंपाकघरात अस्वच्छता. वसतिगृहाच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. त्याची दखल घेत मुंडे यांनी वरळी येथील मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतिगृहाला भेट दिली. त्यांच्यासमवेत सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री संजय बनसोडे व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुंडे यांनी या वेळी वसतिगृहामध्ये जाऊन तेथील दुरवस्थेची पाहणी केली. मात्र ही अवस्था बदलण्यासाठी तातडीने कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. वरळी येथील वसतिगृहाची आपण स्वत: जबाबदारी घेऊन त्यात आवश्यक त्या तातडीने सुधारणा करण्यात येतील, त्याचबरोबर राज्यातील शासकीय मागासवर्गीय वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी योग्य ते धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

On the Occasion of WEDDING SEASON Presenting
New Crafts Silk India 2020
DON'T MISS IT
Exhibition & Sale
Silk Saree | Suits | Dress Material | Stoles | Dupattas | Kurtas
Kurties I Pure & Probable Silk | Tussar Silk I Shanthipur Silk
Pure Silk Products directly Purchase by Weavers from Across India
CIDCO EXHIBITION CENTER
Opp. Platinum Techno Park & Jeyalakhsmi Jewellery, Behind Vashi Central, Sector 30A, Vashi, Navi Mumbai
From : 16th to 26th January 2020
FULL A/C
Products on Display - Orissa : Sambhalpuri Ikkat Silk Saree, Bihar : Dragnic Tassar Silk Sarees, Suit & Stoles, Assam : Muga & Eri Silk Sarees, Karnataka : Creap Silk, Georgette Silk, Arini Silk & Printed Sarees, Tamilnadu : Kanjeevaram Silk Sarees & Designer Fancy Sarees, Andra Pradesh : Dharmavara, Uppada, Gadwal, Mangalagiri & Pochampalli Sarees, Uttar Pradesh : Mulhari Silk, Jamdani, Jamawari Silk Sarees & Chiffon Silk, Maharashtra : Designer Dress materials: Chhattisgarh : Exclusive Raw Silk Sarees, Kosa Silk, Tassar Suit & Dupatta: Madhya Pradesh : Maheswari, Chanderi Silk Sarees & Suit, West Bengal : Baluchari, Dhaka Masli, Gicha Sarees, Boutique Sarees, Kantha Sarees, Zardoshi, Jammu & Kashmir : Chinon Silk, Tady Silk, Printed Sarees, Pashmina Shawls & Rajasthan : Kota Silk, Handi Block Print Dress & Sarees Punjab : Fulkari Dress and many more...
5 DAYS ONLY
All Credit & Debit Cards Accepted
Time : 10.30 am - 8.30pm Entry & Parking Free
M : +91 7464-812450

मुंबईतील बांधकाम परवान्यांमध्ये व्यवसाय सुलभता
MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
मुंबईतील बांधकाम परवाने सुलभ केले तुम्हाला गरज आहे का?
अर्ज सादर करताना मालमत्ता पत्र ?
मालमत्ता पत्र स्वतंत्रपणे घेण्याची आवश्यकता नाही. डिजिटली स्वाक्षरी केलेले मालमत्ता पत्र अर्ज सादर करते वेळी उपलब्ध आहे
भूमापन नकाशा ?
अधिकृत भूमापन नकाशे खालील वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध आहेत. mahabhunakasha.mahabhumi.gov.in
अग्निशमन ना-हरकत मिळविण्यासाठी अग्निशमन सल्लागार?
विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावलीनुसार असलेल्या १५०० चौ.मी. पर्यंतच्या बांधीव क्षेत्रफळाच्या आणि तळमजला +१ मजली गोदामांच्या प्रस्तावासाठी अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.
पाया उत्खननासाठी स्वामित्वशुल्क प्रमाणपत्रक मिळवणे आवश्यक आहे का?
उत्खनन केलेली माती जर त्याच भूखंडावर वापरण्यात येणार असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वामित्वशुल्क प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.
ना-हरकतीची सूचना (आयओडी) मिळण्यास विलंब ?
जर कोणत्याही सवलतीची आवश्यकता नसेल तर ना-हरकतीची सूचना (आयओडी) ५ दिवसांच्या आत मिळू शकते.
पुढील प्रारंभ प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी अधिक वेळ लागतो ?
स्थळ पाहणीनंतर पुढील प्रारंभ प्रमाणपत्रे त्वरित डाउनलोड करता येतात.
पूर्णत्व प्रमाणपत्र मिळण्यासाठी आपणास पर्जन्य जलवाहिन्या, अग्निशमन, मलनिःसारण, जल अभियंता विभागाकडून विविध आवेदने किंवा पाहणी आवश्यक आहेत का ?
या सर्व विभागाकरिता सामूहिक अर्ज व तपासणी (एकाच दिवसात) घेण्यात येईल "एक खिडकी योजनेची" या विभागाचे एकात्मिकरण केले आहे. आता सर्व प्रमाणपत्र कन्सोलवर ऑनलाईन पद्धत केली जातात जे २४ तासाच्या आत अपलोड केले जातील
भोगवटा प्रमाणपत्रक तथा इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अधिक वेळ लागतो ?
भोगवटा प्रमाणपत्रक तथा इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र पहिल्या पाहणीनंतर पहिल्या दिवसात डाउनलोड करता येतील.
Help desk: Email: mcgmhelpdeskops@gmail.com | Contact no.: / Whatsapp: 8530067447
PRO1826

Scanned by CamScanner